**सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपास व्ही.सी.वर :–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – व्यंकट मारुती शेवरे,

वय – ४० वर्षे, व्यवसाय– भाजीपाला विक्रेता,

पत्ता – रा.मदनसूरी, ता.निलंगा, जि.लातूर

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

सन २०२४ मध्ये मी सकाळी फिरायला गेलो होतो तेंव्हा मला गणेश पोतदार यांच्या दुकानाचे शटर उचकलेले दिसले. म्हणूण मी गणेश पोतदार यांना फोन करुन सदर घटना सांगीतली. त्यानंतर गणेश पोतदार दुकाणात आले. पुढे काय झाले ते मला माहित नाही.

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. एच. व्ही. गायकवाड यांच्यामार्फत साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु :–**

२. पोलिसांनी माझा जबाब घेतला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मार्च २०२४ मध्ये मी कथन करतो तशी घटना घडली नाही. मी फिरायला गेलो तेंव्हा माझ्याकडे फोन नव्हता. मी घरी जावून फोन केला होता. मी घरी सकाळी ५.४५ वाजता गेलो होतो. माझ्याकडे कोणता मोबाईल होता हे मला सांगता येत नाही. मी कोणत्या नंबरला फोन केला हे मला सांगता येत नाही. मला लिहीता वाचता येत नाही. मला फोन लावता येत नाही. मी तो फोन लावला नव्हता. माझ्या मुलाने फोन लावला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.02.24 11:24:55 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

दिनांक–२३/०२/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा